सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९१२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३

# मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन देण्याबाबत अधिनियम, १९१२

(दिनांक १३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित)

## BOMBAY ACT No. III OF 1912

# The Bombay Racecourses Licensing Act, 1912

**(As modified upto 13th November, 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रुपये ३.८० ]

S(H) 731

# मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन देण्याबाबत अधिनियम, १९१२

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव आणि व्याप्ती. .. | १ |
| २. | व्याख्या. .. | २ |
| ३. | लायसन न दिलेल्या शर्यतीच्या जागांवर घोड्यांची शर्यत करण्यास प्रतिबंध. .. | २ |
| ४. | घोड्याच्या शर्यतीकरिता लायसनसाठी अर्ज; .. | ३ |
| | घोड्याच्या शर्यतीसाठी लायसन देणे; .. | ३ |
| | लायसन रद्द करणे. .. | ४ |
| ५. | लायसन न दिलेल्या शर्यतीच्या जागेवरील घोड्याच्या शर्यतीत भाग घेतल्याबद्दल शास्ती. | ४ |
| ६. | लायसन न दिलेल्या जागेत शर्यतीस परवानगी दिल्याबद्दल मालक वगैरेस शास्ती. | ४ |
| ७. | लायसनच्या शर्तींच्या उल्लंघनाबद्दल शास्ती. .. | ५ |
| ८. | या अधिनियमान्वये अपराध संज्ञेय असणे. .. | ५ |
| ९. | माफी. .. | ५ |




H-731

# सन १९१२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ [1]

[मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन देण्याबाबत अधिनियम, १९१२]*

[६ जून १९१२]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम यांन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत:—

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४.

सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ (२४ ऑक्टोबर १९७४).†

**[2] [मुंबई राज्यातील] शर्यतींच्या जागांबद्दल लायसन देण्याबाबत तरतूद करणारा अधिनियम**

**ज्याअर्थी,** [2][मुंबई राज्यातील] [3][घोड्यांच्या शर्यतींचे व त्याच्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संबंध असलेल्या सर्व गोष्टींचे नियमन, नियंत्रण व व्यवस्था करण्यासाठी] तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी** पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

**१.** (१) या अधिनियमास मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन देण्याबाबत अधिनियम, १९१२ असे म्हणावे. संक्षिप्त नाव आणि व्याप्ती.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९१२, भाग ७, पृष्ठ १३१; प्रवर समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राचे पृष्ठ १३२ आणि विधानपरिषदेतील कामकाजासाठी वरील राजपत्राचे पृष्ठ २२१ आणि ४७१ पहा.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* हा अधिनियम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्यातील ज्या भागाला लागू होत नव्हता त्या भागाला लागू करण्यात आला. (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २ पहा.)

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

H-731-a

**(२)** [१] [हे कलम संपूर्ण [२] [महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.] बाकी अधिनियम, [३][ [४] [राज्य] शासन] [५] [राजपत्रात] अधिसूचना प्रसिद्ध करून निहित करील अशा क्षेत्रासच केवळ लागू असेल :

१९५८ चा मुंबई हैद्राबाद विनियम, १३५८ फ.

[६] [परंतु, मुंबईचा शर्यतींच्या जागांबद्दल लायसन देण्याबाबत आणि मुंबई पण कर (व्याप्ती वाढविणे व सुधारणा याबाबत) अधिनियम, १८५८ हा अंमलात आल्यावर अधिनियमाच्या बाकीच्या तरतुदी, ह्या हैद्राबादचा घोड्यांच्या शर्यती व पण यांवर कर बसविण्याबाबत विनियम, १३५८ फ., हा अशा प्रारंभाच्या निकटपूर्वीच्या विभागात लागू होता त्या विभागास लागू होतील.]

व्याख्या.

२. या अधिनियमात—

(क) "घोड्याची शर्यत" या संज्ञेचा अर्थ, ज्या कोणत्याही शर्यतीत कोणताही घोडा, घोडी किंवा खच्ची केलेला घोडा ही, इतर कोणताही घोडा, घोडी किंवा खच्ची केलेला घोडा ह्याबरोबर, कोणत्याही प्रकारच्या किंवा जातीच्या बक्षिसाकरिता, किंवा असा कोणताही घोडा, घोडी किंवा खच्ची केलेला घोडा किंवा त्यावर स्वार होणारे यांच्या संबंधाने केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही पणाकरिता किंवा पैजेकरिता स्पर्धेने धावतात किंवा धावविली जातात आणि जेथे विसाहून अधिक माणसे हजर असतील अशी शर्यत, असा समजावा;

(ख) "शर्यतीची जागा" या संज्ञेचा अर्थ, ज्या कोणत्याही जागेवर घोड्याची शर्यत करता येईल, अशी जागा असा समजावा.

लायसन दिलेल्या शर्यतीच्या

**३.** (१) कोणतीही घोड्याची शर्यत ही, ज्या शर्यतीच्या जागेबाबत ह्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार घोड्याची शर्यत करण्यासंबंधात मंजूर केलेले लायसन अंमलात आहे अशा शर्यतीच्या जागेखेरीजकरून इतर कोणत्याही शर्यतीच्या जागेवर करता कामा नये.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ८ (ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

जागांवर घोड्यांची शर्यत करण्यास प्रतिबंध.

(२) अशा लायसनच्या अटी [1][राजपत्रात] प्रसिद्ध केल्या पाहिजेत.

घोड्याच्या शर्यती-करिता लायसन-साठी अर्ज.

**४.** (१) कोणत्याही शर्यतीच्या जागेच्या मालकास, पट्टेदारास किंवा भोगवटा करणारास अशा शर्यतीचे जागेवर घोड्याची शर्यत करण्याकरिता लायसन मिळण्यासाठी [2][[3][राज्य] शासनाकडे] अर्ज करण्याचा अधिकार आहे.

घोड्याच्या शर्यतीसाठी लायसन देणे.

(२) [2][[3][राज्य] शासनास] [4][ते] योग्य वाटेल अशा शर्तीच्या व अशा मुदतीच्या अधीन राहून, असा लायसन तहकूब करण्याचा किंवा तो देण्याचा अधिकार असेल [5][अशा शर्तीमध्ये पुढील गोष्टींची तरतूद करण्याचा अधिकार असेल:—

(क) लायसन फी देणे;

(ख) निरनिराळ्या जातींच्या घोड्यांवर लावता येण्याजोगी पैजांची रक्कम;

(ग) लोकांना जॉकी होण्याचे शिक्षण देण्यासाठी करावयाचे उपाय;

(घ) [3][राज्य] शासनाच्या मते ज्या गोष्टींची लायसनमध्ये तरतूद करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशा घोड्याच्या शर्यतीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संबंध असलेल्या इतर गोष्टी];

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील आदेशान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "त्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][(३) [२][[३][राज्य] शासन] अशा लायसनमध्ये [२][[३][राज्य] शासनाकडून] विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून, अशा लायसनद्वारे, लायसनधारकास, या राज्यात किंवा राज्याबाहेर असेल अशा जागांवर घेण्यात येणाऱ्या घोड्याच्या शर्यतींच्या बाबतीत [४][कोणत्याही बुकमेकरास आपला धंदा किंवा व्यवसाय करण्यास किंवा बुकमेकर किंवा शर्यती संबंधातील कमिशन एजंट म्हणून काम करण्यासाठी लायसन किंवा परवाना देण्यास प्राधिकृत करता येईल. लायसनधारकास देण्यात आलेल्या लायसनच्या मुदतीपेक्षा अधिक नसेल अशा लायसनधारकास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत] असे लायसन देईल आणि;]

लायसन रद्द करणे.

[५][(४)] [२][[३][राज्य] शासनास] ह्या कलमान्वये दिलेले कोणतेही लायसन, ते ज्या शर्तींच्या अधीन राहून देण्यात आले असेल त्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याचे प्रसंगी कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार आहे.

लायसन न दिलेल्या शर्यतीच्या जागेवरील घोड्याच्या शर्यतीत भाग घेतल्याबद्दल शास्ती.

**५.** ज्या कोणत्याही शर्यतीच्या जागेबाबत कलम ४ च्या तरतुदींनुसार दिलेले लायसन अंमलात नाही अशा शर्यतीच्या जागेवरील कोणत्याही घोड्याच्या शर्यतीत जो कोणी इसम भाग घेईल तो पराकाष्ठा दोनशे रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

लायसन न दिलेल्या जागेत शर्यतीत परवानगी दिल्याबद्दल मालक वगैरेस शास्ती.

**६.** ज्या कोणत्याही शर्यतीच्या जागेबाबत कलम ४ च्या तरतुदींनुसार दिलेले लायसन अंमलात नाही अशा शर्यतीच्या जागेवर कोणत्याही घोड्याची शर्यत करण्यात येईल तर अशा शर्यतीच्या जागेचा मालक, लायसनदार किंवा भोगवटा करणारा इसम हा, पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

---

[१] सन १९७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४४, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला आणि तो मजकूर १ मे १९७३ पासून अंमलात आला असल्याचे नेहमीकरिता समजण्यात येईल.

[५] सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ९ (अ) (दोन) अन्वये पोट-कलम (५) ला पोट-कलम (४) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

७. [१][(१)] ज्या कोणत्याही इसमास कलम ४ च्या तरतुदीनुसार लायसन देण्यात आले आहे असा इसम जर, असे लायसन ज्या शर्तीच्या अधीन राहून देण्यात आले असेल अशा शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील तर अशी व्यक्ती, एक हजार रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. लायसनच्या शर्तींच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

[२][(२) ज्या कोणत्याही इसमास लायसनदाराने, कलम ४, पोट-कलम (३) च्या तरतुदींस अनुसरून लायसन किंवा परवाना दिला आहे अशी व्यक्ती जर, ज्या शर्तींच्या अधीन राहून असे लायसन किंवा परवाना देण्यात आला असेल अशा शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील तर अशी व्यक्ती, एक हजार रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.]

८. प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाच्या किंवा प्रथम श्रेणीच्या फौजदारी न्यायाधीशाच्या दर्जाहून कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाने ह्या अधिनियमान्वयेच्या अपराधाची न्याय चौकशी करता कामा नये. या अधिनियमान्वये अपराध संज्ञेय असणे.

९. [३][[४][राज्य] शासनास] [५][राजपत्रात] सामान्य किंवा विवक्षित आदेश प्रसिद्ध करून, वेळोवेळी कोणत्याही घोड्याच्या शर्यतीस ह्या अधिनियमाच्या अंमलातून माफी देण्याचा अधिकार आहे. माफी.

---

[१] सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ९ (ख) अन्वये कलम ७ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ख) अन्वये पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.